RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२६)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

सन १८८८ चा मुंबई ३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

धोक्याच्या जागा दुरूस्त करण्यासाठी किंवा त्यांस कुंपण घालण्यासाठी आयुक्ताने कार्यवाही करणे.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३२९ च्या पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३) मुंबई शहरात ज्या ज्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला तसेच रहिवासी वस्त्यांच्या शेजारी जुन्या टेकड्या पावसाळ्यात कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असल्याने सडकेवरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांचा व या परिसरातील रहिवाशांचा अपघात टाळण्यासाठी अशा जागांचे परीक्षण करून त्याजागी संरक्षक भिंत उभारण्याची कार्यवाही आयुक्त करील ".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी रहिवाशांच्या वस्तीच्या कडेला जुन्या टेकड्या अस्तित्वात असून अनेक वेळा पावसाळ्याच्या वेळेस सदर टेकड्या अचानक कोसळून जीवित व वित्त हानी होत असते, त्यामुळे अशा टेकड्यांचे योग्य वेळी पावसाळया अगोदर परीक्षण करून त्या जागी संरक्षक भिंत बांधणे आवश्यक झाले आहे. जेणेकरून त्यायोगे मुंबई शहरात असे होणारे अपघात व त्या माध्यमातून होणारी जीवित व वित्त हानी टाळता येईल. म्हणून यास्तव मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यामध्ये आवश्यक सुधारणा करणे इष्ट झाले आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २३ जून,२०२५

**अतुल भातखळकर,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै,२०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१.
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.